पिण्याच्या पाण्याच्या शुध्दीकरणासाठी वापरण्यात येणा–या टी.सी.एल.पावडर खरेदीवर जिल्हा परिषदा/ग्रामपंचायतींना ५०% अनुदान देणे.

---

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

शासन निर्णय क्रमांक : ग्रापापु १०९६/प्र.क्र.११५७/पापु.०७

मंत्रालय, मुंबई– ४०० ०३२. दिनांक ५ सप्टेंबर, १९९६.

पहा:– [१] शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु–१०९६/प्र.क्र.११५७/पापु–०७, दिनांक १५ मे, १९९६.

प्रस्तावना :– राज्याच्या ग्रामीण भागातील जनतेस ग्रामीण पाणी पुरवठा योजनांतून मिळणारे पिण्याचे पाणी शुध्द स्वरुपात मिळणे ही एक अत्यावश्यक बाब आहे. पिण्याचे शुध्दपाणी ग्रामस्थांना मिळावे म्हणून, जिल्हा परिषदा/ग्राम पंचायती टी.सी.एल. पावडर सारख्या औषधीद्रव्यांचा वापर करीत असतात. तथापि, पाणी शुध्दीकरणासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था वापरत असलेल्या टी.सी.एल. पावडर आदि औषधी द्रव्यांच्या खरेदीवर होणारा खर्च फार मोठया प्रमाणात असतो व तो संपूर्ण खर्च करणे संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांना परवडत नाही. म्हणून जिल्हा परिषदांना/ग्राम पंचायतींना टी.सी.एल. पावडर खरेदीवर येणा–या खर्चाच्या ५०% अनुदान देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या संदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला असून यासाठी नवीन बाब भाग–१ द्वारे अर्थसंकल्पात रु.४६०.०० लाखाची दत्तमत योजनेतर तरतूद करण्यात आलेली आहे.

शासन निर्णय :– ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या पाणी शुध्दीकरणासाठी लागणा–या टी.सी.एल. पावडरची खरेदी ग्राम पंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांमार्फत केली जाते. अशाप्रकारे खरेदी केलेल्या टी.सी.एल. पावडर खरेदीवर येणा–या एकूण खर्चाच्या ५०% इतकी रक्कम संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान म्हणून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ~~या [illegible]~~ सदर कार्यक्रम महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम १०० [१][बी] अन्वये जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात येत आहे. याबाबतची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहील :–

[अ] ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या पाणी शुध्दीकरणासाठी लागणा-या टी.सी.एल.पावडरची खरेदी ग्राम पंचायती, पंचायत समित्या वा जिल्हा परिषदा यांनी नेहमीच्या विहित पध्दतीप्रमाणे प्रथम स्वतःच्या निधीतून करावी.

[ब] वरील प्रमाणे टी.सी.एल. पावडरची खरेदी केल्यानंतर याबाबतची देयके संबंधित ग्रामपंचायती व पंचायत समित्यांनी जिल्हा परिषदेकडे छाननीसाठी व प्रतिपूर्तीसाठी पाठवावीत.

[क] वरील [ब] येथे नमूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायत व पंचायत समितीकडून मिळालेली टी.सी.एल.पावडरची देयके संबंधित जिल्हा परिषदेने छाननी करावी व ती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर संबंधीत संस्थाना ५०% अनुदान प्रतिपूर्तीचे स्वरूपात मंजूर करावे.

[ड] जिल्हा परिषदेने टी.सी.एल. पावडरची खरेदी प्रथम त्याचे निधीतून करुन त्यानंतर याबाबतच्या देयकाची छाननी जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने करुन मान्य खर्चाच्या ५०% रक्कम प्रतिपूर्तीच्या स्वरूपात समायोजित करुन घ्यावी.

२. ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदा यांना टी.सी.एल.पावडर खरेदी खर्चाच्या ५० टक्के देण्यात येणारे अनुदान हे दिनांक १ एप्रिल,१९९६ पासून पुढे खरेदी केलेल्या टी.सी.एल.पावडरच्या खरेदीवर अनुज्ञेय राहिल. यावरील खर्चासाठी रु.४.६० कोटी इतकी तरतूद नवीन बाबीद्वारे चालू वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. सदर तरतूदीचे वाटप करण्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

३. याबाबतचा खर्च "मागणी क्रमांक वाय-६,३६०४,. स्थानिक संस्था व पंचायती राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे, २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे, [दोन] पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत पाणी शुध्दीकरणासाठी लागणा-या टी.सी.एल.पावडर खरेदीवर येणा-या खर्चाच्या ५० टक्के पर्यंत अनुदान जिल्हा परिषदा व ग्रामपंचायतींना देणे [३६०४-०४८-८]" या लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. व त्याखालील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

...३/-

४. हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ प्र.क्र. ९३३/९६/व्यय-३, दिनांक ३१.०८.१९९६ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

[ ग. गो. पंचभाई ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव

मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,

मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद.

सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळ.

सर्व विभागीय आयुक्त.

मुख्य अभियंता [ग्रामिण], महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, मुंबई.

संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे-३७.

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर [लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता].

मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/नागपूर.

सर्व उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा.

नियोजन विभाग [ २ प्रती]

वित्त विभाग [व्यय-३/अर्थोपव्यय] महसूल व वन विभाग/स.का., सां.का. व क्रिडा विभाग / सार्वजनिक आरोग्य विभाग/वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्वकार्यासने.

निवड नस्ती, का.क्र. पापु-०७ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.

38